अनुसुचित उपक्षेत्रातील लहान तलावांमधील मासेमारीचे अधिकार ग्रामपंचायतीला सुपूर्द करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
शासन निर्णय, क्रमांक:संकिर्ण-२०१४/प्र.क्र.१९४ /पंरा-२
बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१
दिनांक:-२-८ ,२०१४

प्रस्तावना:-

राज्यातील ग्रामपंचायती सक्षम करण्यासाठी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमात सुधारणा करुन ग्रामपंचायतींना /ग्रामसभांना विशेष अधिकार देण्यात आलेले आहेत. त्यास अनुसरुनच ग्रामपंचायतींना कोणताही महत्वाचा निर्णय घेण्यापूर्वी ग्रामसभेची मान्यता घेणे आवश्यक करण्यात आलेले आहे.

आदिवासी भागातील अनुसुचित उपक्षेत्रातील तलावांचा विकास होण्याच्या दृष्टीने १०० हेक्टर खाली तलावांचे मासेमारीचे हक्क ग्रामपंचायतीकडे सोपविण्याची बाब विचाराधीन होती.ही बाब विचारात घेऊन शासनाने आता पुढील प्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय —

१. पंचायत विस्तार अधिनियम, १९९६अंतर्गत समाविष्ट अनुसुचित क्षेत्रातील १०० हेक्टर खालील लहान तलावांनमध्ये मासेमारी करण्यासाठी संबंधित ग्रामपंचायतींना हस्तांतरीत करण्यात यावेत.

२. ग्रामपंचायतीने ग्रामसभेच्या मान्यतेनुसार सदर तलावांचे हक्क मासेमारी करिता स्वत:कडे ठेवावेत किंवा जाहीर लिलाव पध्दतीने देण्यात यावेत.

३. ग्रामपंचायतीच्या हद्दीतील स्थानिक पारंपारिक मच्छीमार यांचे हक्क ग्रामसभेमध्ये ठराव घेऊन अबाधीत ठेवण्यात यावेत व त्यांना मासिक परवाना देऊन मासेमारी करण्यास मुभा देण्यात यावी.त्यांनी पकडलेली मासळी तलाव ठेकेदारांना विक्री करण्यात यावी.

४. तलाव ठेका किंमत ठरवितांना शासन निर्णय क्र.मत्सवि १२१३/प्र.क्र.४८/पदुम-१३/ दि.२२.१०.२०१३ व शुध्दीपत्रक ५.१२.२०१३ परिच्छेद क्र १२ अन्वये न्युनतम तलाव ठेका रक्कम ठरविण्यात यावी.अधिकतम तलाव ठेका रक्कम ठरविण्याबाबत ग्रामसभेत निर्णय घेण्यात यावा.

५. मस्यव्यवसाय विभाग शासन शुध्दीपत्रक दि.५.१२.२०१२ अनुक्रमांक १२ नुसार तलावामध्ये इष्टतम मस्यबीज साठवणुक करणे आवश्यक आहे.

६. मासेविक्रीतुन / तलाव ठेकयातुन मिळणारी रक्कम / मासेमारी परवाना देण्यातुन मिळणारी रक्कम इत्यादी ग्रामपंचायतीने याबाबतचा लेखाजोखा ठेऊन ग्रामनिधीमध्ये ठेवण्यात यावा.

७. शासकिय योजनेतुन मस्यव्यवसाया करिता आलेले अनुदान ग्रामनिधीमध्ये ठेवुन त्याचे लेखेजोखे स्वतंत्र ठेवण्यात यावेत.वरिल सर्व व्यवहार ग्रामसभेची मान्यता घेऊन करणे आवश्यक राहील.

८. तलाव ठेका देणे व मासे संवर्धन करण्या संदर्भात तांत्रिक सहाय्य मिळण्यासाठी ग्रामपंचायतींना मस्यव्यवसाय विभागाकडे मागणी करण्याचे अधिकार राहतील.सर्व

मासेमारीच्या वेळी दिर्घकालीन मत्स्यसंवर्धनाचे निकष पाळण्यात यावेत.व त्याची जबाबदा ग्रामपंचायत व ग्रामसभा यांची राहील.

९. जेव्हा एकापेक्षा जास्त ग्रामपंचायत हददीमध्ये तलाव येत असेल अशा वेळी सद तलाव ठेक्याने देण्याची कार्यवाही पंचायत समितीने करावी.तथापी संबंधित तलाव ठेक्याच निव्वळ उत्पन्नाचा ५०% वाटा हा संबंधित ग्रामपंचायतीमध्ये समप्रमाणात वाटप करण्यात यावा.व उर्वरीत ५०% वाटा पंचायत समितीस त्यांचा मोबदला देण्यात यावा.यामोबदल्यातुन पंचायत समितीने यासंबंधित तलावांचे देखभाल व दुरुस्तीची कामे करुन दयावी.

१०. तलाव ठेका मासेमारी वर्ष १ जुलै ते ३० जुन असे राहील.तलाव ठेका कालावधी मुदत ५ वर्ष राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( डॉ.नरेश गीते )
उपसचिव,महाराष्ट्र शासन

प्रत:-
१. मा.राज्यपाल महोदयांचे सचिव
२. मा.मंत्री (ग्रा.वि. व पं.रा) यांचे खाजगी सचिव
३. मा.मंत्री (आदिवासी विकास) यांचे खाजगी सचिव
४. मा.राज्यमंत्री (ग्रा.वि. व पं.रा) यांचे खाजगी सचिव
५. मा.सर्व विधानसभा / विधान परिषद सदस्य
६. मा.मुख्य सचिव यांचे वरिष्ठ सहाय्यक, मंत्रालय , मुंबई -३२
७. प्रधान सचिव ग्राम विकास व जलसंधारण विभाग (जलसंधारण), मंत्रालय .मुंबई -३२
८. प्रधान सचिव आदिवासी विकास विभाग, मंत्रालय , मुंबई -३२
९. सचिव ,कृषी व पदुम ( मस्यव्यवसाय ), मंत्रालय . मुंबई -३२
१०. मा.विभागीय आयुक्त सर्व
११. मा.संचालक,यशदा,पुणे.
१२. सर्व संबंधित जिल्हाधिकारी
ठाणे, नाशिक, धुळे,नंदुरबार, जळगाव, अहमदनगर, पुणे, चंद्रपुर, अमरावती, यवतमाळ, नांदेड, गडचिरोली
१३. सर्व संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी
ठाणे, नाशिक, धुळे,नं दुरबार, जळगाव, अहमदनगर, पुणे, चंद्रपुर, अमरावती, यवतमाळ, नांदेड, गडचिरोली
१४. सर्व संबंधित उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत)
ठाणे, नाशिक, धुळे,न दुरबार, जळगाव, अहमदनगर, पुणे, चंद्रपुर, अमरावती, यवतमाळ, नांदेड, गडचिरोली
१५. सर्व संबंधित गटविकास अधिकारी
ठाणे, नाशिक, धुळे,न दुरबार. जळगाव, अहमदनगर, पुणे, चंद्रपुर, अमरावती. यवतमाळ, नांदेड, गडचिरोली